# राशिभविष्य - जुलै, २०१९.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==========================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत असलेल्या हर्षलमुळे या राशीच्या मंडळीचा वर्तमान स्वभाव अतिशय अस्थिर, चंचल, लहरी असा घडला असावा, असे वाटते. तसे खरोखरच असेल तर कोणाचाही धाक, दडपण असह्य होत असेल. या राशीची लहान मुले सध्या अतिशय वांड, खोडकर अशी झाली असावीत, असेही दिसते. असे असले तरी या राशीच्या प्रथम स्थानी असलेला हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल हे निश्चित. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच सर्व प्रकारे अनुकुल होणार आहे. त्यामुळे त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. आरोग्य चांगले राहील, वरिष्ठ तुमच्या कामावर खूष होतील. त्यामुळे काहीना बढती, पगारवाढ, शासकीय नोकरदार मंडळीपैकी कोणास उच्च पद किंवा मानाचे स्थान असे काही मिळू शकेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती प्रतिकुल होणे संभवते. त्यामुळे अनारोग्य, दु:ख, कामात होणारी दिरंगाई, कौटुंबिक त्रास, वाढता खर्च, अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप होणे संभवते. त्यामुळे काहींना गहरे नैराश्य येणेही शक्य दिसते. पण बुध ग्रहामुळे मित्रसुख व गृहसौख्य मिळू शकेल. चतुर्थ स्थानी असलेल्या राहूमुळे कौटुंबिक त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या सर्व प्रकारच्या कला क्षेत्रातील मंडळींना कोणत्याही आर्थिक लाभाची अपेक्षा न करता केवळ कलेसाठी कला हे तत्व लक्षात घेऊनच कलाविष्काराचा आनंद व सुखसमाधान लाभू शकेल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे काहींचे नवे स्नेहसंबंध जुळून येतील, प्रेमसंबंध असतील तर ते दृढ होतील, विवाहेच्छू युवक युवतींचे विवाह होतील. काहींना प्रवासयोग येतील तर काहींना आर्थिक लाभ होणेही संभवते. कुमार्गी मित्रांपासून दूर राहा. नेपच्यूनमुळे आर्थिक घोटाळे, येणाऱ्या धनास विलंब होणे संभवते. जपा. या राशीच्या काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करण्याची उर्मी येईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज स्नान झाल्यावर २१ वेळा "ओम गं गणपतये नमः:" मंत्राचा जप करा.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींना सर्वांगीण आरोग्याच्या दृष्टीने या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. काही मंडळींना मोठा आजार त्रस्त करील; तर काहींना त्वचारोग, मुखदंत रोग, रक्तविकार , नेत्रविकार अशापैकी एखादा आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या पूर्वार्धात वाढता खर्च, त्यात आर्थिक नुकसानीची भर, शिवाय देणेकऱ्याचे देणे कसे द्यायचे याची चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. रवि -मंगळ- शुक्र हे तिन्ही ग्रह अनुकुल असल्यामुळे काही मंडळींना बढती, काहींना एखादे उच्च पद किंवा मनाचे स्थान मिळण्याची शक्यता आहे. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांपासून अधिक अर्थलाभ होईल. काही मंडळींना भूमिलाभ होणेही संभवते. बुधामुळे हितशत्रूंचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह ठरतील. काहींचे प्रेमसंबंध घट्ट होतील. ज्या गर्भवती स्त्रियांचा प्रसूतिकाळ या महिन्यात आहे त्यांना पुत्रलाभ होणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या शनि -केतुमुळे शारीरिक-मानसिक अनारोग्याचा त्रास होणे संभवते. काही मंडळींना त्वचा रोग, मुखदंत रोग त्रस्त

करतील; तर काही मंडळीना रक्तविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. . जपा. त्याशिवाय हा केतू वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या दशम स्थानी असलेला नेपच्यून ग्रह व्यावसायिकांच्या व्यवसायात अस्थिर परिस्थिती निर्माण करील. पण हा नेपच्यून मनोवैज्ञानिकांना व द्रव पदार्थ व्यापार असणारांना मात्र अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे अनपेक्षितपणे येणाऱ्या वाईट प्रसंगाला किंवा अगदी जिवावरच्या प्रसंगाला तोंड द्यावे लागण्याची शक्यता आहे. जपा. काहींना बेअब्रूच्या प्रसंगाला तोंड द्यावे लागेल. काही मंडळींच्या बाबतीत अकारण शत्रुत्व निर्माण होणेही शक्य आहे. श्रद्धा असेल तर श्रीशिवोपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती व मन:शक्ती देऊ शकेल. दररोज स्नान झाल्यावर या राशीच्या पुरुषानी एक माळ "ओम नम: शिवाय" मंत्राचा व स्त्रियांनी " ओम शिवाय नम:" मंत्राचा जप करावा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करावे.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. शारीरिक, मानसिक अनारोग्याचा सतत त्रास सहन करावा लागेलसे दिसते. तसेच या राशीच्या नोकरदार मंडळींना घरीदारी सतत शरीरपीडा, अकारण श्रम, दगदग सहन करावी लागेलसे दिसते. हट्टी स्वभाव व मानापमानाच्या अवाजवी कल्पना असल्यामुळे असह्य मनस्ताप सहन कारावा लागण्याची शक्यता दिसते. त्यातच आर्थिक नुकसान होणे, वाढत्या खर्चाची चिंता असणे, कौटुंबिक जीवनात गैरसमज, वाद, भांडणे होणे, शारीरिक उष्णता भडकून घसा, मान, दाढा दुखणे, नेत्रविकार बळावणे अशा प्रकारचे अनारोग्य व असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. राहूमुळे
काही मंडळींना वातविकाराचा आजार त्रस्त करील. जपा. आध्यात्मिक उपासना व संयम-सहनशीलतेचे आचरण केल्यास काळ काही प्रमाणात सुसह्य होईल, व शुक्राच्या अनुकुलतेमुळे मिळणाऱ्या सुखाचा आनंद लुटता येईल. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला गुरु ग्रह बौद्धिक, शैक्षणिक नोकरी-व्यवसाय असणारांना पूरक होईल. त्याचप्रमाणे आरोग्य सुधारण्यासही मदत करील. या राशीच्या सप्तम स्थानी
असलेल्या शनि -केतु मुळे मनस्थिती अस्थिर राहील व जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येईल. जपा. विवाहेच्छूना लवकर विवाह योग संभवत नाही. त्याच्यामुळे अकारण शत्रुत्व निर्माण होणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या हर्षलमुळे काही मंडळींना अर्थलाभ होऊ शकेल; पण एकूण सर्वच बाबतीत अनिश्चितता असल्याचा अनुभव येईल. शिवाय मित्रांशी वाद, भांडणे होणेही संभवते. अशा सर्व प्रकारे प्रतिकुल परिस्थितीत आध्यात्मिक उपासनेस काळ अनुकुल असल्यामुळे मनापासून ओढ असणाऱ्या दैवताची उपासना केल्यास उपासनेत प्रगती होईल व मनस्थिती शांत व स्थिर राहू शकेल. तसेच या राशीच्या काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील व काही मंडळींना परदेशगमनाची संधी प्राप्त होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती प्राप्त होईल. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(४) कर्क -** कारण असो वा नसो, या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींची मनस्थिती अस्वस्थ राहण्याची शक्यता आहे. तसेच हट्टी स्वभाव, मानापमान फार असेल तर अकारण

शरीरपीडा, श्रम. दगदग होणे संभवते. त्यामुळे थकवा येणे संभवते. या राशीच्या नोकरदार मंडळीना तर या महिन्याचा काळ अत्यंत प्रतिकुल असण्याचीच शक्यता आहे. सतत मनाविरुद्ध घटना घडतील. त्याचा परिणाम शारीरिक आरोग्य बिघडण्यात होईल. चंचल, अस्वस्थ मनस्थितीमुळे काही मंडळींना कुसंगतीची बाधा होणे संभवते. मित्रद्रोह होणेही संभवते. अशा प्रतिकुल काळात रक्तदाब, हृदयविकार असे आजार असणारांनी अत्यंत सहनशील बनून व मनावर संयम ठेवून आचरण केल्यास पुष्कळच सुखाचे होईल. अशा प्रतिकुल परिस्थितीत शुक्र ग्रहाच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. तसेच या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या राहूमुळे काही मंडळींना अर्थलाभ होणे संभवते; तर काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. पण या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला शनि नोकरीव्यवसायास पूरक होणार असला तरी अनारोग्यकारक असल्याचाच अनुभव येईल. त्याच्यामुळे अकारण शत्रुत्व निर्माण होणे, गैरसमजुतीमुळे वाद, भांडणे होणे, अनारोग्य होणे संभवते. या राशीच्या दशम स्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ प्रगतिकारक व यशदायक होईल. जल भय असल्यामुळे नौकाविहार, जलप्रवास करू नका व खोल पाण्यात पोहू नका. तसेच विष भय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या पंचम स्थानी असलेला गुरु ग्रह अनुकुल असल्याने या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. तसेच ज्यांचे प्रेमसंबंध आहेत ते संबंध घट्ट होतील. काही मंडळींना अर्थलाभ तर काहीना अन्य प्रकारे सुखसमाधान लाभेल. श्रद्धा असेल तर “शिवोपासना” व “श्रीहनुमान उपासना” अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज स्नान झाल्यावर पुरुषांनी एक माळ “ओम नम:शिवाय “ व स्त्रियांनी “ ओम शिवाय नमः: “ मंत्राचा एक माळ जप करावा व रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालिसा” स्तोत्राचे पठण करावे.

**(५) सिंह -** या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. त्यामुळे जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करावा. या राशीच्या भ्याग्यस्थानी असलेला हर्षल ग्रह शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. त्यामुळे काही मंडळींना बढती, काहींना अधिकारपद, काहींना मानाचे स्थान तर काहींना एखादे उच्च पद मिळण्याची शक्यता आहे. पण राहूमुळे अधिकारपदाचा दुरुपयोग होणार नाही, याची काळजी घ्या. शिवाय या राहूमुळे संततिसुखात बाधा येण्याची शक्यता दिसते. जपा. तसेच या राहूमुळे वाममार्ग धन मिळविण्याचा मोह होईल. त्या मोहाला बळी पडू नका. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी रवि ग्रहासह मंगळ -बुध हे एकमेकांचे शत्रू ग्रह असल्यामुळे आर्थिक चिंता, मनस्ताप देणाऱ्या मानहानीकारक घटना, वाद, भांडणे, यामुळे होणारे शारीरिक अनारोग्य अस्वस्थ करण्याची शक्युता आहे. जपा. सहनशील बनून मनावर संयम राखून आचरण कराल तर शुक्र ग्रहाच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून ज्या मनोनुकुल घटना घडतील त्यांचा आनंद अनुभवू शकाल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल; काही मंडळींचे स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार पार पडतील; पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता जाणवते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या शनि -केतुमुळे शारीरिक अनारोग्य झाल्यास या राशीच्या विद्यार्थ्याचे शिक्षणात अडथळे निर्माण होतील व त्यांना शैक्षणिक प्रगती करणे अशक्य होईल.

विशेष करून पोटाच्या अनारोग्याचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी असलेला नेपच्यून विविध कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता दिसत्ते. भाग्यस्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना मन:शक्ती व मन:शांती देऊ शकेल.

**(६) कन्या -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. मोठ्या लोकांच्या ओळखी होतील व त्यामुळे काही लाभदायक घटना घडतील. शासकीय नोकरदार मंडळींपैकी काही मंडळींना बढती, काहींना पगारवाढ, काहींना अधिकार पद तर क्वचित कोणास एखादे उच्च पद वा मानाचे स्थान प्राप्त होणे संभवते. पण महिन्याच्या पूर्वार्धात स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्र ग्रह या राशीच्या लाभस्थानी गेल्यावर
अनुकुल होईल व सर्व प्रकारे सुखसमाधान, धनलाभ व ऐषारामाची साधने प्राप्त होतील व मन:शांती लाभेल. लाभस्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे मैत्रीत वितुष्ट निर्माण होणे संभवते. पण याच मंगळामुळे काही मंडळींना मौल्यवान गोष्टींचा लाभही होऊ शकेल. या राशीच्या तृतीय स्थानी असलेला गुरु ग्रह या राशीच्या साहित्यिक लेखन करीत असलेल्या लेखकांना अनुकुल होईल व त्यांचे साहित्य ग्रंथरूपात प्रकाशित होईल. काही मंडळींना यात्रा, प्रवासाचे योग येतील. पण याच गुरु ग्रहामुळे भावंडांपैकी कोणाकडून तरी मनस्ताप; दिला जाण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या शनि -केतू ग्रहांमुळे विविध कारणांनी गृहसौख्यात बिघाड होणे संभवते. घरातील कोणाशीही न पटणे, मातेच्या आजाराची चिंता त्रस्त करणे तसेच एखादी दु:खद घटना घडून नैराश्य येणे संभवते. केतुमुळे विषभय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या नेपच्यून ग्रहामुळे काही मंडळींना फसवणूक झाल्याचा त्रास त्रस्त करील, काहींना काल्पनिक चिंता त्रस्त करतील तर काही मंडळींना उगीचच आपल्याला काही भयंकर आजार झाला असल्याची चिंता त्रस्त करील. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या हर्षलमुळे अपघात भय असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. वाहन चालवत असताना सेलफोनवर वार्तालाप करू नका. नियंत्रित वेगानेच वाहन चालवा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल , प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण मंगळ ग्रहामुळे नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागेल. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडतील. महिन्याचे शेवटचे दहा दिवस अधिकच धक्कादायक जाण्याची शक्यता आहे. पण बुध ग्रहाच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. या राशीच्या काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही तरी करावेसे वाटेल. पण त्यांनी अविचाराने कोणताही निर्णय घेऊ नये. महिन्याच्या पूर्वार्धात शुक्र ग्रह अनुकुल असल्यामुळे काही मनोनुकुल घटना घडतील. थोरामोठयांची कृपा प्राप्त होईल. प्रवासाचे योग येतील. पण नोकरीत मानहानी, वरिष्ठांचा विरोध, मानसिक ताण सहन करावा लागेल. जपा. या

राशीच्या धनस्थामी असलेल्या गुरु ग्रहामुळे कुटुंबात शुभ घटना घडतील. आर्थिक लाभ होणेही शक्य दिसते. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे काही मंडळींना उत्तम नोकरी मिळू शकेल किंवा आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. शनि सह असलेल्या केतूमुळे मानसिक दु:ख सहन करावे लागेल. पण अध्यात्माची मनापासून आवड व ओढ असेल तर उपासनेद्वारे होणारा मनस्ताप सुसह्य होईल. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होणे संभवते. पण गूढ संशोधन व अध्यात्म यांत प्रगती होणे शक्य दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या हर्षलमुळे जीवनसाथीचे लहरी, विक्षिप्त आचरण, पति पत्नीत होणारे वाद, गैरसमज, भांडणे अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. ज्यांचा भागीदारीत उद्योग-व्यवसाय आहे त्यांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. श्रद्धा असेल तर "शिवोपासना" अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. दररोज स्नान झाल्यावर पुरुषांनी एक माळ "ओम नमः: शिवाय" मंत्राचा व स्त्रियांनी एक माळ "ओम शिवाय नमः:" मंत्राचा जप करावा व "शिवलीलामृत" स्तोत्राचे पठण करावे.

**(८) वृश्चिक -** शनि ग्रहाच्या साडेसातीचा केवळ काही महिन्यांचाच काळ शिल्लक राहिला आहे. दिनांक २४ जानेवारी, २०२० पासून या राशीची मंडळी शनि ग्रहाच्या साडेसातीतून मुक्त होत आहेत. तोपर्यंत या राशीच्या मंडळींनी मनावर व विचारशक्तीवर नियंत्रण ठेवून व सहनशील बनून आचरण केल्यास सर्व सुखाचेच होईल. या राशीच्या नोकरदार मंडळींना या संपूर्ण महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. इच्छा अपूर्ण राहतील. हाती घेतलेल्या कामात अडथळे, अडचणी येतील वा अपयश येईल. जपा. मुलांपैकी कोणाच्या आजाराची चिंता त्रस्त करील. स्वतःची रोगप्रतिकारशक्ती कमी झाल्यामुळे एखादा आजार होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरीत कामाचा ताण व वरिष्ठांचा जाच, आणि घरी आरोग्यविषयक चिंता व वडील मंडळींचा विरोध त्रस्त करील. पण या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या शुक्र-राहूमुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहीना असा अचानक धनलाभ होईल. काही मंडळींना वारसाहक्काने असा अचानक धनलाभ होणेही संभवते. शक्यतो या महिन्यात प्रवास करू नका. प्रवासात असह्य मनस्ताप व मानहानी होणे संभवते. बुध ग्रह सुद्धा प्रतिकुलच आहे. त्यामुळे वाद, भांडणे होणे संभवते. तसेच नियोजित कामात अडचणी, अडथळे येणे संभवते. या राशीच्या प्रथम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे बौद्धिक, शैक्षणिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना आपल्या कामात प्रगती करणे व यश मिळविणे सहज शक्य होईल. शिवाय शारीरिक आरोग्य उत्तम राहील. पण या राशीच्या धनस्थानी असलेल्या शनि व केतू ग्रहांमुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडणे, आर्थिक चिंता निर्माण होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या नेपच्यून ग्रहामुळे घरगुती बाबतीत घोटाळे, गैरसमज, वाद होण्याची शक्यता आहे. तसेच या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या
हर्षल ग्रहामुळे काही मंडळींना डोकेदुखीचा तर अति विचार करणारांना मेंदूविकाराचा आजार त्रस्त करील. जपा. श्रद्धा असेल तर "श्रीगणेश उपासना" व "श्रीहनुमान उपासना " मन:शक्ती व मनशांती देईल. दररोज स्नान झाल्यावर नियमितपणे २१ वेळा "ओम गं गणपतये नमः:" मंत्राचा जप करा व रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा" स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात स्वतः:च्या व जीवनसाथीच्या अनारोग्याची चिंता त्रस्त करीलसे दिसते. तसेच नियोजित कामात अडथळे, अडचणी निर्माण झाल्यास नैराश्य येईल. कुटुंबातील काही प्रिय जनांचे काही कारणाने स्थलांतर झाल्यास मन अस्वस्थ होईल..अशा परिस्थितीत या राशीच्या काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येणे संभवते. अपघात भय, वाहन धोका असल्याने रस्त्याने चालत जाताना विचाराच्या तंद्रीत चालू नका. किंवा वाहन चालवू नका. सतत सावधानतेने मार्गक्रमण करा. सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अतिशय भावनाशील झाली असल्यास आध्यात्मिक साधना करा. त्यात यश येईल. तसेच ज्यांना गूढ संशोधनाची आवड आहे त्यांनी आध्यात्मिक साधना अवश्य करावी. त्यासाठी गुरु ग्रह अनुकुल आहे. त्यात यश येण्यास काळही अनुकुल आहे. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे या राशीच्या काही मंडळींना जलप्रवासाची तर काहींना परदेशगमनाची संधी प्राप्त होईल. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे काही मंडळींना अंतर्ज्ञान शक्ती प्राप्त होईल; तर उच्च बौद्धिक व कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल , प्रगतिकारक व लाभदायक होईल. तसेच या राशीच्या व्ययस्थानी असलेला गुरु ग्रह सामाजिक कार्याची आवड असणारांनाही प्रगतिकारक व यशदायक होईल. पण तो कौटुंबिक त्रास निर्माण करील व अपेक्षाभंग करणेही शक्य आहे. जपा. शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात मनस्ताप होणे संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात रवि ग्रह सप्तम या केंद्रस्थानी असल्याने थोडा अनुकुल होईल; पण महिन्याच्या उत्तरार्धात शारीरिक-मानसिक दृष्ट्या अनारोग्यकारकच होईल. काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील; तर काही मंडळींना रोगप्रतिकारशक्ती कमी झाल्यामुळे उष्णताविकाराचा आजार त्रस्त करील. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी रवि ग्रहासह मंगळ, बुध व शुक्रही असल्यामुळे उष्णताविकाराच्या आजाराबरोबरच काही मनोनुकुल व लाभदायक घटना घडतील. बुधामुळे कार्यसिद्धी होईल; तर शुक्रामुळे अचानक धनलाभ होणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे "बावन्न शलोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(१०) मकर -** . या राशीच्या मंडळींचा स्वभाव सध्या अत्यंत लहरी, चंचल झाला असण्याची शक्यता आहे. तसेच राशिस्वामी शनि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्याने अनारोग्यकारक व मनस्तापदायक असणार आहे. त्यामुळे या राशीच्या मंडळींनी सतत मन व विचारशक्तीवर नियंत्रण ठेवून व सहनशील बनून, जिभेला लगाम घालूनच आचरण करावे. तेच सुखाचे होईल. त्यामुळे शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने ज्या काही मनोनुकुल घटना घडतील त्यांचा आनंद अनुभवू शकाल. या काळात सर्व आर्थिक व्यवहार विचारपूर्वक व फसवणूक होणार नाही याची खात्री करूनच करा. अकारण मानहानी, मनस्ताप होणे संभवते. जपा. काही मंडळींना कोर्टप्रकरणाचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता जाणवते. जपा. अस्वस्थ मनस्थिती व संतापी स्वभाव झाल्यास घरीदारी कोणाशी पटणार नाही. आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही. सतत तक्रारी करत राहाल. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अधिक प्रमाणात अनुकुल होईल. राहूमुळे इतर जातिधर्माच्या लोकांशी ज्यांचा व्यावसायिक संबंध आहे अशांना अशा संबंधामुळे आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. तसेच या राहूमुळे हितशत्रू पराभूत होतील. या राशीच्या षष्ठ स्थानी शुक्र असेपर्यंत अंगी गुण, अनुभव असूनही कर्तृत्व सिद्ध करण्यास संधीच मिळणार नाही. त्यामुळे निराश होऊ नका.

कारण महिन्याच्या उत्तरार्धात हा शुक्र या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर परिस्थितीत सुधारणा होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेले मंगळ - बुध हे दोन्ही एकमेकांचे शत्रू ग्रह वैवाहिक जीवनातील सुखात बाधा आणण्याची दाट शक्यता आहे. जपा. जीवनसाथीचे अनारोग्य, दोघांतील गैरसमज, वाद अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. ज्यांचा भागीदारीत व्यापारव्यवसाय आहे अशांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात शुक्राच्या अनुकुलतेमुळे काही प्रमाणात वैवाहिक जीवनातील सुख लाभू शकेल. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे या राशीचे विद्यार्थी शैक्षणिक प्रगती करू शकतील, काही प्रमाणात इच्छा आकांक्षा पूर्ण होतील, काही मंडळींना विवाहयोग येईल, तर काहींना आर्थिक लाभ होतील. श्रद्धा असेल तर "शिवोपासना " व "श्रीहनुमान उपासना" अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे स्नान झाल्यावर या राशीच्या पुरुषांनी एक माळ " ओम नमः: शिवाय " मंत्राचा तर स्त्रियांनी एक माळ "ओम शिवाय नमः:" मंत्राचा जप करावा व "शिवलीलामृत" स्तोत्राचे पठण करावे. . तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करावे.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अति कोमल झाली असल्यास मानसिक संवेदनाही त्वरित होत असतील आणि त्यामुळे थोडे जरी मनाविरुद्ध काही घडले तरी लगेच गहिरे नैराश्य येत असेल, असे वाटते. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात नोकरीत वरिष्ठ अधिकाऱ्याचा जाच, अपमान होणे, कामाचा ताण आदि गोष्टी घडण्याची शक्यता आहे. त्यात भर म्हणून घरगुती जीवनात स्वतः:चे अनारोग्य, नातेसंबंधात येणारा दुरावा, मुलांपैकी कोणाच्या अनारोग्याची तर कोणाची आचरणविषयक समस्या त्रस्त करीतसे दिसते. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे काही मंडळींना उष्णताविकाराचे आजार त्रस्त करतील. दुखापत होणे, ताप येणे, अपप्रचाराचा असह्य मनस्ताप सहन करावा लागणे, अंगावर फोड येणे, अशापैकी आजार होण्याची शक्यता आहे. जपा. रक्तविकार, हृदयविकार असणारांनी मनाचा क्षोभ होणार नाही याची काळजी घ्यावी. शुक्र ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात सर्व प्रकारच्या कलावंत मंडळींना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. पण महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात कलागुण दर्शविण्यास संधीच मिळणार नाही. या राशीच्या दशम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे बौद्धिक, शैक्षणिक, शास्त्रीय संशोधनात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना संपूर्ण माहिन्याचा काळ अनुकूल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. वरिष्ठ अधिकारी तुमच्या कर्तृत्वाचे कौतुक करतील. काही मंडळींना नवे आवडते कार्यक्षेत्र मिळेल. काही भाग्यवान मंडळींच्या कर्तृताचा मानसन्मान केला जाईल. या राशीच्या लाभ स्थानी असलेला शनि ग्रह आर्थिक दृष्ट्या लाभदायक असला तरी संततिसुखाचे दृष्टीने तापदायकच ठरेल. शनि ग्रहासह केतूही लाभदायक असून त्याच्यामुळे प्रवासयोग येतील. अर्थलाभ होणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीशिवोपासना अनुकुल होईल व दिलासा मिळेल. दररोज नियमितपणे स्नान झाल्यावर पुरुषानी "ओम नम: शिवाय" मंत्राचा व स्त्रियांनी "ओम धिवाय नमः:" मंत्राचा एक माळ जप करा व "शिवलीलामृत " स्तोत्राचे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा" स्तोत्राचे पठण करा.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ सर्वच बाबतीत प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे सतत कसली तरी चिंता त्रस्त करील. त्यामुळे मानसिक व्यग्रता वाढून गहिरे नैराश्य येण्याची शक्यता दिसते. या राशीच्या धनस्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे मनस्थिती अति अस्थिर होईल व त्यामुळे स्वभाव अति चंचल, लहरी व विक्षिप्त होणे संभवते. कोणाचा कसला धाक वा दडपण सहन होणार नाही. त्यामुळे अविचाराने वाटेल तसा खर्च केला जाणे संभवते. तसेच समोरची व्यक्ती कोण आहे याचा विचारही मनात येणार नाही व त्यामुळे आपल्या फटकळ बोलण्याने अकारण समोरच्याचा अपमान होईल. जपा. सतत विचित्र आचरण घडेल. या राशीची लहान मुले तर अतिशय हूड व खोडकर झाली असण्याची शक्यता जाणवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या रवि -राहूमुळे कौटुंबिक त्रास, अनारोग्य, कार्य दिरंगाई, आर्थिक चिंता, कुटुंबात काही अनिष्ट घडणे, हाती घेतलेल्या कार्यात अपयश येणे अशापैकी प्रतिकुल घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. पण महिन्याच्या पूर्वार्धात या चतुर्थ स्थानी शुक्र ग्रह असल्याने स्वतः:च्या मालकीची शेतीवाडी असणारांना त्यापासून लाभ होणे संभवते. महिन्याचा उत्तरार्ध या राशीच्या नोकरदार मंडळींना प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. अनारोग्य, अपघात, नोकरीत वरिष्ठांचा जाच, अस्वस्थ मन , प्रिय जनांपासून होणारा दुरावा, संततीपैकी कोणाकडून होणारा त्रास किंवा संततीपैकी कोणाच्या अनारोग्याची चिंता, अशापैकी मनस्ताप होणे संभवते. काही मंडळींना स्थावरविषयक चिंता त्रस्त करील. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. पण या राशीच्या सर्व प्रकारच्या कलावंत मंडळींना महिन्याचा अखेरचा सप्ताह कलेसाठी कला या दृष्टीने आनंददायक होईल. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे अध्यात्माची मनापासून आवड असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. काही भाग्यवान मंडळींना कीर्ती -प्रसिद्धी मिळू शकेल. काहींना प्रवासाची संधी मिळेल. या राशीच्या दशम स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे लोखंड, कोळसा यांचा व्यापार असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. पण शनि ग्रहासह असलेल्या केतूमुळे काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करावेसे वाटेल. पण त्यांनी तसे करू नये. आहे ती नोकरीच नेकीने करावी. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. दररोज नियमितपणे “_बावन्न
श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा.

=====ooooo0ooooo=====